<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६२/२०२०</u>

( केशव शंकर बांदिवडेकर विरुध्द दिपिका दिगंबर पांचाळ व.८)

## :– नि. २५ खालील आदेश –:

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्र.वादी नं. ७ लक्ष्मी जगन्नाथ बांदिवडेकर या दिनांक ०८/१०/२०२३ रोजी मयत झालेल्या असून त्यांचे विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी नं. ७ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी यांचे अर्जातील कथन असे की, या दाव्यातील प्र.वादी नं. ७ लक्ष्मी जगन्नाथ बांदिवडेकर या दिनांक ०८/१०/२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. त्याबाबतची खात्रीलायक माहिती वादी यांना हल्लीच समजली. वादीने गोवा येथे प्रत्यक्ष जाऊन मृत्यु दाखल्याची सहीसुद नक्कल मिळविण्याचे प्रयत्न केले परंतु मृत्युचा दाखला प्राप्त होऊ शकलेला नाही. गोवा येथील स्थानिक स्वराज्य संस्थेकडे चौकशी केली असता, अद्याप प्रतिवादी नं. ७ यांच्या मृत्यूची नोंद दाखल नसल्याचे सांगितले. वादी हे नोकरीमुळे मुंबईत रहातात त्यामुळे त्यांना वारंवार गोवा येथे जाणे शक्य होणारे नाही. प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस ता. ०७/०१/२०२४ पर्यंत रेकॉर्डवर न आणलेमुळे त्यांचेविरुध्द दावा 'अबेट' झाला आहे. प्रतिवादी नं. ७ हे प्रतिवादी यांना सामिल असलेमुळे उर्वरीत प्रतिवादींनी त्यांच्या मृत्युदाखल्याची माहिती मुद्दाम लपवून ठेवली असून त्यांचे विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी नं. ७ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. अबेटमेंट आदेश सेट असाईड न झाल्यास वादीचे पैशाचे स्वरुपात कधीही न भरुन येणारे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. तसेच वारसांना संधी मिळणे न्यायोचित आहे जेणेकरुन त्यांना दाव्याचे कामी कैफियत देणे शक्य होईल व दावा गुणदोषावर चालेल. तरी सदरचा अबेटमेंट आदेश

न्यायपुर्ततेकरीता रद्दबातल करुन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास रक्कम रुपये एक हजार वादीवर आकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

०५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. ७ लक्ष्मी जगन्नाथ बांदिवडेकर या दिनांक ०८/१०/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी नं. ७ यांचे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्यामुळे प्रतिवादी क्र. ७ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीमध्ये वादीचा १/४ हिस्सा आहे असा ठराव होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी आणि प्रतिवादी नं. ७ व ८ यांच्या पुर्वाधिका-यांनी, प्रतिवादी नं. १ ते ५ यांच्या पुर्वाधिका-यांना लिहून दिलेले खरेदीखत निम्म्या हिश्शापुरते रद्द होऊन मिळणेसाठी व तत्परिणामी कायमच्या ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं. ७ चे कायदेशीर वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

१. नि. २५ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी नं. ७ विरुध्द दावा उपशमित झाल्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

PAWAN RAMBHAU DHORE
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.03.21 15:57:36 +0530

दिनांक– २०/०३/२०२४ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.